15-09-2024-Dai-06_Layout 1 9/14/2024 11:49 PM Page 1



# गणपतीलाही तुरुंगात टाकले : मोदींची टिका

**चंदीगड, दि. १४ :**



हरियाणा विधानसभा मतदारसंघात सभेसाठी गेलेले पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले की भारतीय जनता पक्ष हरियाणात विजयाची हॅट्रिक मारणार आहे. हरियाणाच्या भूमीवरून पंतप्रधान मोदींनी काँग्रेसवर टीका करत म्हटले की काँग्रेस फक्त तुष्टीकरणाचे राजकारण करते. सभेला संबोधित करताना मोदी म्हणाले की कर्नाटकमध्ये त्यांचे (काँग्रेसची) सरकार आहे, त्यांनी आपल्या गणपती बाप्पालाच तुरुंगात टाकले. आता हे तुष्टीकरणाचे राजकारण नाही तर काय आहे?

निवडणूक प्रचारासाठी पंतप्रधान मोदी हरियाणाच्या कुरुक्षेत्रमध्ये पोहोचले, जिथे त्यांचे स्वागत मुख्यमंत्री नायब सिंह सैनी यांनी केले. सभेत मोदींनी त्यांच्या नेहमीच्या शैलीत स्थानिक भाषेत जनतेचे स्वागत केले आणि सांगितले की त्यांना या भूमीवर येऊन खूपच आनंद होत आहे. आपल्या भाषणात त्यांनी मुख्यमंत्री सैनी यांचे कौतुक केले आणि म्हणाले, आपले भाजप सरकार जे काही बोलते ते पूर्ण करते. आमच्या सरकारने ३ कोटी पक्क्या घरांना मंजुरी दिली आहे. प्रत्येक गरीबाचे स्वप्न असते की त्याचे स्वतःचे असे एक पक्के घर असावे. आज १ कोटी महिला लखपती दीदी बनल्या आहेत आणि अजून ३ लाख महिलांना लखपती बनवण्याचे उद्दिष्ट आहे. केंद्र सरकारच्या सर्व योजनांचा लाभ हरियाणालाही मिळाला आहे. शेकडो लखपती दीदी आज हरियाणातही तयार झाल्या आहेत. ७० वर्षांपेक्षा जास्त वयाच्या प्रत्येक वृद्ध व्यक्तीला आता ५ लाख रुपयांपर्यंतचा आरोग्य विमा मिळेल.

पंतप्रधान मोदी म्हणाले की काँग्रेस सुरुवातीपासूनच आरक्षणविरोधी राहिली आहे. नेहरू पंतप्रधान असताना त्यांनी आरक्षणाचा विरोध केला होता. नेहरुंनी असेही म्हटले होते की आरक्षणामुळे सरकारी सेवांची गुणवत्ता खालावेल. नेहरुंनी ओबीसी आरक्षणासाठी स्थापन केलेल्या काका कालेलकर आयोगाच्या अहवालाला दुर्लक्षित केले होते.

पंतप्रधान मोदी म्हणाले, इंदिरा गांधी आल्या तेव्हा त्यांनीही ओबीसी आरक्षणावर बंदी घातली. जेव्हा देशाने त्यांना शिक्षा दिली, भाजपचे सरकार आले, तेव्हा मंडल आयोग स्थापन झाले. पण नंतर काँग्रेस परत आली आणि मंडल आयोगाचा अहवालही थंड पडला. त्यानंतर राजीव गांधींच्या सरकारनेही ओबीसींना आरक्षण दिले नाही. पंतप्रधान म्हणाले की, काँग्रेस कान उघडून ऐका... जोपर्यंत मोदी आहे, तोपर्यंत बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या आरक्षणातून एक कणही लुटू देणार नाही, आरक्षण हटवणार नाही... ही मोदीची हमी आहे.'

पंतप्रधान मोदी म्हणाले, मी काँग्रेसवाल्यांना विचारतो... ते लोक कर्नाटक आणि तेलंगणामध्ये किती पिके एमएसपीवर खरेदी करतात? तिथल्या शेतकऱ्यांना किती एमएसपी देतात? हे लोक एमएसपीबाबत मोठा गोंधळ घालतात, तर आमचे हरियाणा हे देशातील असे राज्य आहे जे २४ पिके एमएसपीवर खरेदी करते. काँग्रेस शेतकऱ्यांसाठी बड्या गोष्टी करतात, त्यांना मोठी स्वप्ने दाखवतात. सत्य हे आहे की ते काहीच करत नाही, सगळे खोटे आहे. जर काँग्रेसमध्ये दम असेल तर ती कर्नाटक आणि तेलंगणामध्ये त्यांच्या शेतकरी योजना लागू का करत नाही? हे फक्त फसवणुकीच्या गोष्टी करतात आणि काही नाही.

पंतप्रधान मोदींनी हरियाणातून काँग्रेसवर निशाणा साधला आणि म्हणाले, काँग्रेस जम्मू-काश्मीरमध्ये कलन ३७० पुन्हा लागू करण्याच्या बाजूने आहे. म्हणजे, काही वर्षांपूर्वी, जिथे हरियाणाच्या वीर सैनिकांवर दगडफेक होत होती, काँग्रेस त्या काळाला परत आणू इच्छित आहे. काँग्रेस दहशतवाद आणि फुटीरतेच्या काळाला पुन्हा परत आणू इच्छित आहे. काँग्रेसचे राजकारण देशविरोधी आहे.

## छळाची तक्रार नोंदवण्याऱ्या महिलेलाच अटक

**चैनई, दि. १४ :**



तमिळनाडूमध्ये एक विचित्र घटना समोर आली आहे, जिथे छळ झाल्याबद्दल तक्रार घेऊन पोलिस ठाण्यात गेलेल्या महिलेलाच अटक करण्यात आली आहे. राज्य महिला आयोगाने या प्रकरणात दोन पोलीस अधिकाऱ्यांविरुद्ध चौकशीची शिफारस केली आहे. पीडित महिलेवर मानव तस्करी आणि इतर गुन्ह्यांशी संबंधित आरोपांखाली बेकायदेशीर पद्धतीने अटक केल्याचा दावा आहे. आयोगाने या प्रकरणी तांबरम पोलिस आयुक्तांना पत्र लिहिले आहे. यात म्हटले आहे की, 'महिला मागील वर्षी ऑगस्ट महिन्यात काही ऑटोरिक्षा चालकांविरुद्ध छळाची तक्रार नोंदवण्यासाठी पोलीस ठाण्यात गेली होती. तिने सांगितले की, ४ महिन्यांपासून तिला त्रास दिला जात आहे.'

अहवालानुसार, पोलिस ठाण्यातील अधिकाऱ्यांनी महिलेची तक्रार नोंदवण्यास नकार दिला. त्यांनी आपल्या मोबाईलमध्ये तिचे फोटो काढले आणि पीडित महिलेवर बेजबाबदारपणे टिप्पणी केल्याचा आरोपही केला. मात्र, जेव्हा तिने पोलिस अधिकाऱ्यांच्या या वागणुकीवर आक्षेप घेतला तेव्हा त्यांनी तिला अटक करण्याची धमकी दिली. त्यामुळे महिला संतापली आणि अधिकाऱ्यांशी वाद घालू लागली. त्यानंतर तिला अटक करण्यात आली. तिच्यावर भारतीय दंड संहितेच्या विविध कलमांखाली आणि अनैतिक तस्करी प्रतिबंध (रोकथाम) कायद्याच्या कलम ८ (ब) अंतर्गत आरोपांसाठी तिला पाच महिन्यांसाठी न्यायालयीन कोठडीत पाठवले.

तुरुंगातून बाहेर आल्यावर महिलेने संपूर्ण घटनेची माहिती आयोगाला दिली. त्यानंतर पोलिसांवर चौकशीची शिफारस करण्यात आली. पोलिस निरीक्षक चार्ल्स आणि उप-निरीक्षक दुर्गा यांच्यावर गंभीर आरोप करण्यात आले आहेत. महिला पॅनलने म्हटले की, या प्रकरणात सीआरपीसीच्या कलम ४१ चे पालन झाले नाही. सीआरपीसीच्या कलम ४१ अंतर्गत काही खास परिस्थितींमध्ये पोलिसांना वॉरंट किंवा न्यायाधीशांच्या आदेशाशिवाय कोणत्याही व्यक्तीला अटक करण्याची परवानगी दिली जाते. आयोगाने सांगितले की, 'या प्रकरणात तांबरम पोलिसांनी मार्गदर्शक तत्त्वांचे उल्लंघन केले आहे. एका महिलेला अटक करून तिला पाच महिने कोठडीत ठेवण्यासारखे कठोर पाऊल उचलले गेले.'

## संशयास्पद बॅगेला हात लावताच झाला स्फोट



**कोलकत्ता, दि. १४ :**

पश्चिम बंगालची राजधानी कोलकत्ता येथे शनिवारी दुपारी स्फोट झाला. या घटनेत एक व्यक्ती जखमी झाला असून, त्याला एनआरएस वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. कोलकत्ता पोलिसांनी सांगितले की, दुपारी सुमारे १ वाजून ४५ मिनिटांनी त्यांना माहिती मिळाली की ब्लोचमन स्ट्रीट आणि एस.एन. बॅनर्जी रोडच्या दरम्यान स्फोट झाला आहे. यात एक व्यक्ती, जो कचरा गोळा करणारा होता तो जखमी झाला आहे. माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी पोहोचले आणि परिसराला घेराव घातला. सध्या या प्रकरणाची चौकशी सुरू आहे. जखमीला एनआरएस रुग्णालयात नेण्यात आले असून त्याच्या उजव्या मनगटाला जखम झाली आहे.

पोलिसांनी सांगितले की, पोलिस या घटनेची सखोल तपासणी करत आहेत. घटनास्थळी बॉम्ब डिटेक्शन अँड डिस्पोजल स्क्वॉड टीमला बोलावण्यात आले. कोलकत्ता पोलिसांनी सांगितले की, सध्या आजूबाजूच्या परिसराची नीट तपासणी केली जात आहे. स्फोट होताच घटनास्थळी घबराट निर्माण झाली होती, मात्र आता परिस्थिती सामान्य होताना दिसत आहे.

घटनास्थळी असलेल्या प्रत्यक्षदर्शीने सांगितले की, स्फोट झाला तेव्हा आम्ही जवळच उभे होतो. आवाज ऐकताच आम्ही त्वरित घटनास्थळी धावलो. आम्ही पाहिले की, कचरा गोळा करणारा एक व्यक्ती तिथे पडला होता, त्याच्या उजव्या मनगटाला जखम झाली होती. स्फोटाचा आवाज खूपच मोठा होता. त्याने सांगितले की, पोलिस लगेच तिथे पोहोचले आणि जखमीला रुग्णालयात नेले. त्यावेळी वाहतूक थांबली होती. प्रत्यक्षदर्शीने सांगितले की, या घटनेत इतर कोणीही जखमी झालेले नाही.

## फिल्मी शैलीत एकनाथ शिंदेंची घोषणा

**मुंबई, दि. १४ :**

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शनिवारी 'लाडकी बहीण योजने'बाबत मोठी घोषणा केली. आगामी विधानसभा निवडणुकीत जर महाराष्ट्रातील जनतेने सत्ताधारी महायुतीला मोठा जनादेश दिला, तर या योजनेंतर्गत दिली जाणारी आर्थिक रक्कम वाढवून ३ हजार रुपये प्रति महिना केली जाईल. सध्या महिलांसाठी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेंतर्गत दरमहा १ हजार ५०० रुपये दिले जातात. शिंदे म्हणाले, आम्ही लाडकी बहीण योजना सुरू केली, ज्याअंतर्गत पात्र महिलांना दरमहा दीड हजार रुपये दिले जात आहेत. जर तुम्ही आमची ताकद वाढवली, तर आम्ही ही रक्कम २ हजार रुपयांपर्यंत वाढवू. जर तुम्ही मोठा जनादेश दिला, तर आम्ही ती रक्कम ३ हजार रुपये करू. आम्हाला ही रक्कम वाढवायला काहीच संकोच वाटणार नाही.

यानंतर मुख्यमंत्री शिंदे फिल्मी शैलीत म्हणाले की, आम्ही जी कमिटमेंट करतो, त्यानंतर स्वतःचेही ऐकत नाही. त्यांनी पुढे सांगितले की, विरोधक आमच्यावर टीका करतात की राज्य सरकार खजिना रिकामा आहे असे सांगून नंतर योजना बंद करेल. पण त्यांनी हे विसरू नये की राज्याचा खजिना हा लोकांसाठी आहे. शिंदे म्हणाले की, जेव्हा त्यांच्या सरकारने महिला प्रवाशांसाठी सरकारी बसचे तिकीट ५० टक्के कमी केले, तेव्हा चिंता व्यक्त केली गेली होती की यामुळे राज्य परिवहन महामंडळाला जास्त तोटा होईल. मात्र, त्यांनी सांगितले की, या उपक्रमानंतर बस सेवा वापरणाऱ्या महिलांची संख्या वाढली, ज्याचा शेवटी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाला फायदा झाला.

## ओसामा बिन लादेनचा मुलगा जिवंत!





**काबूल, दि. १४ :**

ओसामा बिन लादेनचा मुलगा हमजा जिवंत आहे आणि तो अफगाणिस्तानमधून अल कायदाचे नेतृत्व करत आहे, असा एक अहवाल समोर आला आहे. या अहवालात इशारा देण्यात आला आहे की त्याच्या आदेशानुसार, अल कायदा पुन्हा एकत्र येत आहे आणि पाश्चात्य देशांवर भविष्यातील हल्ल्यांची तयारी करत आहे.

द मिररच्या गुप्तचर अहवालानुसार, अल कायदाचा प्रमुख ओसामा बिन लादेनचा मुलगा हमजा बिन लादेन जिवंत आहे आणि तो दहशतवादी संघटनेचे नेतृत्व करत आहे. या अहवालात म्हटले आहे की हमजा आपल्या भावासोबत, अब्दुल्ला बिन लादेनसोबत अफगाणिस्तानातून गुप्तपणे अल कायदा चालवत आहे. तालिबानविरोधी सैन्य संघटना, नॅशनल मोबिलायझेशन फ्रंटने (एनएमएफ) हमजा आणि त्याच्या सहकाऱ्यांच्या ऑपरेशनचा तपशील देणारा एक अहवाल सादर केला आहे. प्रिन्स ऑफ टेरर असे संबोधला जाणारा हमजा ४५० स्नायपर्सच्या सुरक्षेखाली उत्तर अफगाणिस्तानमध्ये लपलेला आहे, असे आउटलेटने म्हटले आहे.

एनएमएफने इशारा दिला आहे की २०२१ मध्ये काबूलच्या पतनानंतर, अफगाणिस्तान विविध दहशतवादी गटांसाठी प्रशिक्षण केंद्र बनले आहे. अहवालात म्हटले आहे की, ''हमजा बिन लादेनला दारा अब्दुल्ला खेल जिल्ह्यात (पंजशीरमध्ये) नेण्यात आले आहे, जिथे ४५० अरब आणि पाकिस्तानी त्याची सुरक्षा करत आहेत.' तसेच त्याच्या आदेशाखाली अल कायदा पुन्हा संघटित होत आहे आणि पाश्चात्य देशांवर हल्ल्यांची तयारी करत आहे, असा इशारा अहवालात देण्यात आला आहे.

एनएमएफच्या अहवालाने २०१९ मध्ये अमेरिकेच्या हवाई हल्ल्यात हमजा मारला गेला असल्याच्या दाव्यांना खोटे ठरवले आहे. असे मानले जाते की हमजाने अयमान अल-जवाहिरीसोबत काम केले होते, ज्याने ओसामा बिन लादेनच्या मृत्यूनंतर अल कायदाचे नेतृत्व केले होते.

अमेरिका आणि इतर देशांवर हल्ल्याचे आवाहन करणारे हमजाचे ऑडिओ आणि व्हिडिओ संदेश समोर आल्यानंतर त्याच्या मृत्यूच्या बातम्या आल्या होत्या. मात्र, बीबीसीच्या एका जुन्या रिपोर्टनुसार, त्याच्या मृत्यूची तारीख आणि ठिकाण स्पष्ट नव्हते. पेंटागॉनने या प्रकरणावर कोणतीही टिप्पणी केली नव्हती. अमेरिकेने अधिकृतपणे हमजा बिन लादेनला जागतिक दहशतवादी म्हणून घोषित केले होते आणि तो इराणमध्ये नजरबंद असल्याचे मानले जात होते.

हमजाचा पिता ओसामा बिन लादेनला २०११ मध्ये पाकिस्तानमधील एबटाबाद येथे अमेरिकी विशेष दलांनी मारले होते. ओसामाने ११ सप्टेंबर २००१ रोजी अमेरिकेवरील हल्ल्याची जबाबदारी घेतली होती, ज्यामध्ये सुमारे ३ हजार लोकांचा मृत्यू झाला होता.

## हिजबुल्लाहने इस्त्रायलवर डागले १३०० हून अधिक ड्रोन

**इराण, दि. १४ :**



इराण समर्थित लेबनानची दहशतवादी संघटना हिजबुल्लाहने शनिवारी इस्त्रायलच्या ठिकाणांवर १ हजार ३०७ ड्रोन आणि शेकडो रॉकेटने हल्ला केला. असा दावा केला जात आहे की हे सर्व ड्रोन अचूकपणे इस्त्रायली ठिकाणांवर पडले. मात्र, इस्त्रायलने सांगितले की त्यांच्या आयरन डोमने बहुतेक हल्ले हवेतच नष्ट केले.

इस्त्रायलने सांगितले की जे ड्रोन आणि रॉकेट इस्त्रायली जमिनीवर आले, त्यातील काही मोकळ्या जागेत पडले तर काहींना हवाई संरक्षण प्रणालीने हवेतच संपवले. इस्त्रायलने गाझा पट्टीतील फिलिस्तीनी लोकांचा नरसंहार थांबवला नाही, तर आणखी घातक हल्ले करू अशी हिजबुल्लाहने यावेळी धमकी दिली.

इस्त्रायलने फिलिस्तीनविरुद्ध युद्ध सुरू केल्यापासून, आतापर्यंत गाझामध्ये ४१ हजार फिलिस्तीनी लोकांचा मृत्यू झाला आहे. त्यात बहुतेक महिला आणि मुले आहेत. हिजबुल्लाहच्या रॉकेट हल्ल्यात अल-मायादीनच्या जलीलमधील इस्त्रायली बेस नष्ट झाला.

हिजबुल्लाहने अमियाद भागातील इस्त्रायली लष्करी बेसवरदेखील हल्ला केला. यासाठी हिजबुल्लाहने कात्युशा रॉकेटचा वापर केला आहे. कात्युशा रॉकेटचा वापर दुसऱ्या महायुद्धापासून सुरू आहे. याचा वापर पहिल्या इंडो- चायना युद्ध, कोरियन युद्ध, विएतनाम युद्ध, इराण- इराक युद्ध, लीबिया आणि सिरिया युद्धातही झाला आहे, आणि आता इस्त्रायल- हिजबुल्लाह संघर्षातही होत आहे.

१९४१ पासून हे रॉकेट तयार केले जात आहे. आतापर्यंत १ लाखांपेक्षा जास्त रॉकेट तयार झाले आहेत. कात्युशा रॉकेटचे अनेक प्रकार आहेत, ज्यामुळे त्यांचे वजन आणि कॅलिबर वेगवेगळे असते. ८२ मिमीपासून ३०० मिमी पर्यंतचे एकूण आठ प्रकार यात आहेत, त्यानुसार त्यांचे वजनही असते. ६४० ग्रॅमपासून २८.९ किलोपर्यंत वजनाचे असतात.या रॉकेटची रेंज २ हजार ८०० मीटर ते ११ हडार ८०० मीटर पर्यंत आहे, म्हणजेच सुमारे ३ किमी ते १२ किमीपर्यंत. रशिया १९२८ पासून हे रॉकेट तयार करण्याच्या कामात होता. मार्च १९२८ मध्ये पहिली रॉकेट चाचणी घेण्यात आली, हे रॉकेट १ हजार ३०० मीटरवर पडले होते. त्यानंतर त्याला अधिक अद्ययावत केले गेले. विशेष म्हणजे हे रॉकेट ट्रक, ट्रॅक्टर, टँक, कार, नौका, स्लेज, ट्रॉलर किंवा ट्रायपॉडने लॉन्च करता येते.सोव्हिएत संघाच्या काळात बनवलेल्या या रॉकेटला बीएम- १३ असेही म्हणतात. एक बीएम- १३ बॅटरीमध्ये चार ते सहा जवान असलेल्या फायरिंग वाहनांचा समावेश असतो. दोन फायरिंगसाठी आणि दोन लोडिंगसाठी. हे लाँन्चर सतत रॉकेट हल्ला करून कोणतेही क्षेत्र उद्ध्वस्त करू शकते आणि शत्रू हल्ला करण्याआधीच आपली जागा बदलू शकते.

## विरोधी पक्षातीलनेत्याने माझ्यासमोर पंतप्रधान पदाचा प्रस्ताव ठेवला होता : नितीन गडकरी

**नवी दिल्ली, दि. १४ :**



केंद्रीय परिवहन आणि राष्ट्रीय महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी शनिवारी दावा केला की २०२४ च्या लोकसभा निवडणुकांपूर्वी विरोधी पक्षातील एका वरिष्ठ नेत्याने त्यांच्यासमोर पंतप्रधान पदाचा प्रस्ताव ठेवला होता, परंतु त्यांनी तो नाकारला. पत्रकारिता पुरस्कार सोहळ्यात माध्यम प्रतिनिधींशी संवाद साधताना नितीन गडकरी म्हणाले, मी त्या नेत्याला सांगितले की, मी एका विचारसरणी आणि विश्वासावर जगणारा व्यक्ती आहे. मी अशा पक्षात आहे ज्याने मला सर्व काही दिले आहे, ज्याची मी कधी कल्पनाही केली नव्हती. कोणताही प्रस्ताव मला आकर्षित करू शकत नाही.

तथापि, नितीन गडकरी यांनी विरोधी पक्षातील नेत्याचे नाव सांगितले नाही, तसेच या घटनेची तपशीलवार माहिती दिली नाही. त्यांनी सांगितले की, २०२४ च्या लोकसभा निवडणुकांपूर्वी एका वरिष्ठ विरोधी नेत्याने त्यांच्याशी संपर्क साधला होता. त्यावेळी असे मानले जात होते की भाजपला पूर्ण बहुमत मिळणार नाही आणि सरकार स्थापन करण्यासाठी काही विरोधी पक्षांच्या पाठिंब्याची गरज भासू शकते. त्यांनी सांगितले, मी त्यांना स्पष्टपणे सांगितले की, मी काही तत्त्वे आणि विश्वासासोबत मोठा झालो आहे आणि त्यांच्याशी तडजोड करणार नाही.

लोकसभा निवडणुकीत भाजपला पूर्ण बहुमत मिळाले नाही. भाजपला फक्त २४० जागा मिळाल्या, त्यानंतर टीडीपी, जेडीयू यांसारख्या पक्षांच्या मदतीने युती सरकार स्थापन करावे लागले. २०१४ आणि २०१९ च्या लोकसभा निवडणुकांमध्ये भाजपने एकहाती बहुमत मिळवले होते. यावेळी काँग्रेसच्या नेतृत्वाखाली विरोधी पक्षांनी इंडिया आघाडी तयार केली, ज्यांनी एकत्रितपणे देशभरात निवडणूक लढवली. याचा परिणाम असा झाला की, एनडीएसाठी ४०० पारचा दावा करणारी भाजप बहुमताच्या आकड्यापासून दूर राहिली. तथापि, नरेंद्र मोदी पुन्हा तिसऱ्यांदा पंतप्रधान बनले. नितीन गडकरीही सलग तिसऱ्यांदा भाजप सरकारमध्ये केंद्रीय मंत्री झाले.